सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दाखल तारीख : २९/०९/२०२६
लोकपाल कार्यालय : ३०/०९/२०२६
निकाल तारीख : ०४/११/२०२६

लोकपाल श्री. श्रीकृष्ण भ. पानसे
(निवृत्त प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश)
निकाल दिनांक : ०४/११/२०२६

निकाल पत्र

अपील क्र. ०५
निशानी क्र. ०७

स्व. ॲड कु. शलाका खांडगे विधी महाविद्यालय,
तळेगाव दाभाडे तालुका– मावळ, पुणे — तक्रारदार

विरूद्ध

विद्यापीठ तक्रार निवारण कक्ष — जाब देणार

०१) विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाने (सोयीसाठी यापुढे विद्यापीठ असा उल्लेख केला आहे.) यांनी नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळाचे स्व. कु .शलाका खांडगे विधी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, तालुका मावळ, जिल्हा पुणे ४१०५०७ यांच्या विरुद्ध दिनांक ११/०९/२०२६ रोजी निकाल पारित केला. (सोयीसाठी म्हणून त्यांचा उल्लेख विधी महाविद्यालय असा केला आहे). विधी महाविद्यालयाने निकालावर नाराज होऊन दिनांक ३०/०९/२०२६ रोजी लोकपाल यांच्यापुढे अपील दाखल केले. दिनांक ०६/१०/२०२६ रोजी संचालक विद्यार्थी विकास मंडळ यांनी पत्र लिहून लोकपालांकडून

अपील सुनावणीची तारीख निश्चित करून घेतली. ती त्यांनी १६/१०/२०२६ अशी ठेवली.

०२) दिनांक ११/०९/२०२६ च्या आदेशात असे म्हटले आहे की 'तक्रारदार विद्यार्थी वैभव विष्णू चव्हाण व महाविद्यालयाचे प्राचार्य यांचे जाब जबाब आणि उपलब्ध कागदपत्रानुसार असे आढळून आले की महाविद्यालयाने सदर विद्यार्थ्यास व्यवस्थापन कोट्यतून प्रवेश दिला. तेव्हा की ज्या विद्यार्थ्यास त्याच्या गुणवत्तेनुसार प्रवेश मिळावयाला हवा होता. सर्व बाबींचा विचार करून असा आदेश देण्यात येतो की नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळाचे स्व. ॲड. कु. शलाका खांडगे विधी महाविद्यालयाने सदर विद्यार्थ्यास व्यवस्थापक कोट्यतून प्रवेशासाठी घेतलेले पैसे परत करून त्या वर सहा टक्के व्याज दराप्रमाणे परत करण्यात यावे. सदर पैसे विद्यार्थ्याच्या बँक खात्यामध्ये दिनांक ३०/०९/२०२६ पर्यंत जमा करण्यात यावे. विद्यार्थ्यांची शैक्षणिक वर्षाकरिता ची नियमित फी वगळून अधिकचे घेतलेले व्यवस्थापन कोट्याचे पैसे सहा टक्के दराने परत करण्यात यावे. तसेच द्वितीय वर्षापासून या विद्यार्थ्याला नियमित विद्यार्थी म्हणून गणले जावे.'

०३) विधी महाविद्यालयातर्फे प्रभारी प्राचार्य श्री तांबे यांनी युक्तिवाद केला. ते असे म्हणाले की एखादा विद्यार्थी जेव्हा व्यवस्थापक कोट्यातून प्रवेश घेतो तेव्हा त्याची निवड सर्वसाधारण खुला प्रवर्ग निकषावर होते. त्याला कागदपत्रांची अनु उपलब्धता व त्रुटी यातून बाजूला होऊन स्वत:हून व्यवस्थापक कोट्याचा मार्ग निवडतात. अशी एकदा बांधिलकी घेतली की तो विद्यार्थी आपली उमेदवारी परत बदलून घेण्यासाठी दावा करू शकत नाही. विद्यापीठाने जो आदेश पारित केला त्यामध्ये गंभीर कायदेशीर त्रुटी आणि स्पष्ट मनमानी दिसून येते. त्यामध्ये कोणतीही कारणे दिलेली नाहीत. जी रक्कम परत करण्याचा आदेश दिला तो नैसर्गिक न्याय तत्त्वाच्या विरुद्ध आहे. असा आदेश करताना सीईटी सेलच्या अधिकारावर अतिक्रमण केलेले आहे. सदरच्या आदेशाने महाविद्यालयाचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होणार आहे .उच्च न्यायालयाचा, न्यायालयांच्या आदेशांचे पालन झालेले दिसत नाही. या सर्व गोष्टींचा विचार करता तो आदेश रद्द करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली.

०४) विद्यापीठातर्फे युक्तिवाद करताना असे सांगण्यात आले की सर्व गोष्टींचा अभ्यास करून कागदपत्रांचे अवलोकन करून नैसर्गिक न्याय तत्त्वांना अनुसरून आदेश दिलेला आहे. त्यात कोणत्याही प्रकारची त्रुटी नाही. तरी तो आदेश कायम करण्यात यावा.

०५) वैभव विष्णू चव्हाण(याचा पुढे उल्लेख चव्हाण असा केलेला आहे) यांनी युक्तिवाद करताना असे सांगितले की, त्याच्यावरती दबाव टाकून त्याच्याकडून व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश घेतला. त्या दिवशी त्याने फी भरली त्याच वेळेला त्याच्यापेक्षा कमी मार्क असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. ज्या दिवशी पैसे भरले त्या दिवशी तो विधी महाविद्यालयात हजर होता हे स्पष्ट दिसून येते. त्यांनी असेही सांगितले की विधी महाविद्यालयाने कॅट ची प्रोसेस योग्य प्रकारे हाताळलेली नाही. विधी महाविद्यालयाचा फायदा व्हावा अशा प्रकारे वर्तणूक केलेली आहे .त्यामुळे विद्यापीठाने जो हुकूम केला तो योग्य आहे. त्याच्यात बदल करण्यात येऊ नये.

०६) दिनांक ३०/०७/२०२५ रोजी कमिशनर व कॉम्प्युटरअथॉरिटी, स्टेट कॉमन एंट्रान्स टेस्ट सेल, महाराष्ट्र स्टेट मुंबई यांनी सेंट्रलाइज ऍडमिशन प्रोसेस कॅप शेड्युल फॉर एलएलबी थ्री इयर्स इंटिग्रेटेड कोर्स अकॅडमीक इयर २०२५–२६ याचे वेळापत्रक जाहीर केले. दिनांक २७/०९/२०२५ रोजी या संदर्भातील म्हणजे इन्स्ट्रक्शन टू कॅंडिडेट्स अँड इन्स्टिट्यूट्स फॉर इन्स्टिट्यूशनल लेवल राऊंड फॉर एलएलबी थ्री इयर्स अकॅडमीक इयर २०२५–२६ नियमासंबंधी परिपत्रक काढले.

०७) चव्हाण यांची प्रवेश प्रक्रिया संबंधात इन्स्टिट्यूट लेवल राऊंड फॉर एसीएपी राऊंड फोर आणि त्या सूचनांचे पत्र याचा विचार करावयास हवा. चव्हाण हे एस सी कॅंडिडेट आहेत. जेव्हा इन्स्टिट्यूट लेवल राऊंड सुरू झाले त्या वेळेला या कॉलेजमध्ये एस सी कॅंडिडेट साठी जागा शिल्लक नव्हती. दिनांक १५/०९/२०२५ रोजी ज्या ज्या मोकळ्या जागा होत्या त्यांची यादी प्रसिद्ध करण्यात आली. विद्यार्थ्यांनी दिनांक १६/०९/२०२५ ते १८/०९/२०२५ या काळामध्ये ऑनलाइन ऑप्शन्स व कॉलेजचा निवड ही कळवावयाची होती. त्यानंतर २०/०९/२०२५ रोजी त्यासंबंधाची मेरिट लिस्ट प्रसिद्ध करण्यात येणार होती. अशी यादी प्रसिद्ध झाल्यानंतर ती कॉलेजच्या नोटीस बोर्डावरती आणि वेबसाईट येथे दाखवण्यात येणार होती. तशीच ती कॅपच्या पोर्टलवर सुद्धा दिसणार होती. त्यानंतर दिनांक २०/०९६/२०२०५ ते २४/०९/२०२५ या कालावधीत विद्यार्थ्यांना प्रसिद्ध केलेल्या गुणवत्ता यादी प्रमाणे त्यांची ऍडमिशन कन्फर्म करण्यात येणार होती. दिनांक २५/०९/२०२५ ही जी कट ऑफ डेट दिली गेली त्यानंतर कोणतीही ऍडमिशन होणार नाही .

०८) जेव्हा एखाद्या विद्यार्थ्याकडून ऍडमिशन साठी पैसे घेतले जातात त्यावेळेला असे धरले जाते की त्याला ऍडमिशन दिलेली आहे. चव्हाण यांचा सीईटी पर्सेंटाइल स्कोर ४७.१७ इतका होता. त्यांनी दिनांक २२/०९/२०२५ रोजी रुपये १,०५,००० इतके भरले. ही मॅनेजमेंट कोट्यतील विद्यार्थ्यांची फी आहे. याचाच अर्थ असा की त्याची

ऍडमिशन त्या तारखेला झाली. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी दिनांक ०६/०२/२०२६ च्या पत्रात पॅरेग्राफ १२ मध्ये असे म्हटले आहे की 'अगेन्स कॅप राऊंड संपल्यावर मॅनेजमेंट कोट्यतील जागा भरण्यात आल्या.' मॅनेजमेंट कोटा हा २४ तारखेला शेवटी सुरू होऊ शकेल. निश्चितच २२ तारखेला नाही.

०९) इन्स्टिट्यूशनल ऍडमिशन च्या परिपत्रकाप्रमाणे दिनांक २०/०९/२०२५ रोजी चव्हाणला विधी महाविद्यालयात हजर राहावयास हवे होते. परंतु तो हजर नव्हता असे विधी महाविद्यालयाचे म्हणणे. ते सकृत दर्शनी चुकीचे दिसते कारण त्याच दिवशी त्याने संस्थेमध्ये फी भरलेली आहे. विधी महाविद्यालयाला हे मान्य आहे की त्याच्यापेक्षा कमी परसेंटाइन असलेल्या शीतल कोलेकर(४०.९४), भगवान बी केदार(२२.५५), तिरुपती चिंचवडे(२५.४१), अक्षय विठ्ठल गोफानी (२०.३८), आणि शुभम ओव्हळ(३५.७३)यांना प्रवेश देण्यात आले. महाविद्यालयाचे हे विधान न पटणारे आहे की चव्हाण यांनी स्वत:हून मॅनेजमेंट कोट्यातून प्रवेश घेतला. कोणताही विद्यार्थी जर सरळ सरळ प्रवेश मिळत असेल तर मॅनेजमेंट कोट्यातून त्या महाविद्यालयात जास्त फी भरून प्रवेश घेणार नाही. हे सर्व प्रवेश ओपन कॅटेगरी या प्रकारात मोडतात. पुढे असेही दिसून येते की त्याला दिनांक २५/०९/२०२६ रोजी प्रोहिजनल प्रोविजनल अलॉटमेंट लेटर देण्यात आले. हे करण्याचे कारण असे दिसते की, इन्स्टिट्यूशनल मेरिट प्रमाणे ज्या ऍडमिशन द्यायच्या होत्या त्या दिल्यानंतर ही ऍडमिशन दिली हे दाखवण्याचा प्रयत्न. तो बरोबर वाटत नाही.

१०) युक्तीवादात असे सांगण्याचा प्रयत्न केला की एकदा मॅनेजमेंट कोट्यातून प्रवेश घेतला की विद्यार्थ्याला कागदपत्रांची पूर्तता आणि इतर गोष्टीचा त्रास नसतो. हे म्हणणेही बरोबर दिसत नाही कारण ऍडमिशन प्रोसेस केल्याचे जे कागद दाखल केले आहेत त्यामध्ये भगवान केदार याच्याकडे कोणतेही कागद नव्हते तरी सुद्धा त्याला वेळ देण्यात आला. त्यानंतर तृप्ती चिंचवडे हिची टीसी नव्हती परंतु शिर्के रजिस्टार यांच्या रेफरन्सने तिला ऍडमिशन देण्यात आले. चव्हाण जरी एससी कॅंडिडेट असला तरी इन्स्टिट्यूशन राउंड मध्ये एस सी ची जागा नसल्यामुळे तो ओपन कॅटेगरीत जाऊन पडला. खरं म्हणजे ही जी परिपत्रके पाहता असे लक्षात येते की विधी महाविद्यालयांची अशी जबाबदारी आहे की प्रत्येक विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त फायदा होईल आणि त्याला आर्थिक झळ बसणार नाही. या प्रकरणांमध्ये तसे झालेले दिसून येत नाही.

११) विधी महाविद्यालयातर्फे युक्तिवाद करताना असे सांगण्यात आले की एकदा फी भरल्यानंतर तीस दिवसाच्या आत संबंधित विद्यार्थ्यांना त्याची ऍडमिशन कॅन्सल करता आली असती. अशी ऍडमिशन कॅन्सल करून तो कोठे जाणार? हे विधी

महाविद्यालय आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे हित जास्तीत जास्त बघणे ही त्यांची जबाबदारी आहे. विधी महाविद्यालयातर्फे युक्तिवाद करताना असे म्हटले की विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाने पारित केलेल्या आदेशात गंभीर कायदेशीर त्रुटी आणि स्पष्ट मनमानी दिसून येते. असा हुकूम करताना त्यांनी कारणे दिलेली नाहीत. मला हुकूमात मनमानी दिसून येत नाही किंवा कायदेशीर त्रुटीही नाही. परंतु हे बरोबर आहे की असा हुकूम पारित करताना जी कारणे द्यावयास हवीत ती दिलेली नाहीत .फक्त एवढेच म्हटले की जाब जबाब आणि कागदपत्रांची पाहणी करून हुकूम पारित केला तेवढे पुरेसे नाही. असं जरी असलं तरी तो हुकूम चुकीचा होत नाही.

१२) विधी महाविद्यालयाचे असेही म्हणणे आहे की चव्हाण यांनी व फोरम शॉपिंग आणि शिस्त याचा भंग केला एकाच कामासाठी विविध ठिकाणी त्यांनी तक्रारअर्ज केले. कागदपत्रांची पाहणी करता हे विधान योग्य वाटत नाही. त्याचे कारण म्हणजे विद्यार्थ्याला हे निर्णय प्रक्रियेचे निरनिराळ्या व्यवस्था असतात हे माहीत नसते. विधी महाविद्यालयाच्या विरुद्ध अर्ज करण्यासाठी म्हणून त्यांनी विद्यापीठाकडे अर्ज केला. तेथील संबंधितांनी विचार विनिमय करून त्यावर कोणताही हुकूम न करता तो सचिव विद्यापीठ तक्रार निवारण कक्ष यांच्याकडे विचारार्थ पाठवून दिला. यात कोठेही फोरम हंटिंग किंवा शॉपिंग हे दिसत नाही. खरं म्हणजे योग्य प्रकारे न्याय व्हावा अशीच कृती यातून दिसून येते.

१३) वरील सर्व गोष्टींचा विचार करता मी खालील प्रमाणे हुकूम करत आहे.

हुकुम

स्वर्गीय ॲड कु शलाका खांडगे विधी महाविद्यालय तळेगाव दाभाडे तालुका मावळ पुणे यांनी केलेले अपील नामंजूर करण्यात येत आहे.

लोकपाल

14/11/26

श्री. श्रीकृष्ण भ. पानसे

दिनांक :– ०४/११/२०२६